**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १६७/०४ निशाणी क्र.१३२ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडे दाखल झालेली रिट पिटीशन क्र. ६४४१/२०१४ दिनांक ०३/०८/२०१७ च्या आदेशान्वये दाव्यात दुरुस्ती केली नाही. दिनांक १४/०२/२०१८ रोजी न्यायालयात दाखल केलेला दावा वरील कारणांस्तव रद्‌दबातल होण्याची विनंती केलेली आहे. वरील बाबींमुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा वादींकडून अवमान झाला. त्यामुळे वादीचा दावा खारीज करण्याची विनंती केलेली आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १ चे पुढे असे कथन आहे की, वादींनी दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी १/४ हिस्सा वाटप होवुन कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. दिनांक ०७/०२/२०१३ रोजी वादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र. ६ वर दावा दुरुस्तीकरीता अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने अंशत: मंजुर केला. सदर आदेशाच्या विरोधात वादींनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रीट पिटीशन क्र. ६४४१/२०१४ दाखल केले. सदर रिट पीटीशनमध्ये वादींची १/४ ऐवजी १/३ हिस्सा वाटप होवुन मिळण्याची मागणी अमान्य करण्यात आली. परंतु, सदर निर्णयानंतर वादींनी दिनांक १४/०२/२०१८ रोजी वादींची मागणी अमान्य झाली असताना देखील दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करुन दाव्यामध्ये १/४ ऐवजी १/३ अशी चुकीची व खोटी दुरुस्ती केली. त्यामुळे वादीने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला. करीता दावा रद्‌दबातल करण्याची विनंती केली.

**३.** वादीतर्फे अर्जास म्हणणे नि.क्र. १३३ वर दाखल केले असुन वादीने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दुरुस्ती करीत असताना अनावधानाने दाव्यामध्ये १/४ ऐवजी १/३ हिस्सा अशी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदर दुरुस्तीकरीता मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना अथवा अवमान करण्याचा कोणताही

हेतु नव्हता. सदरची चुक झाल्याची बाब प्रतिवादी क्र. १ कडून प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर लक्षात आले. सदरची दुरुस्ती रद्द करण्याबाबत वादीने दाव्यात नि.क्र. १३५ वर अर्ज दाखल केला आहे तसेच झालेल्या चुकीबाबत क्षमा करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींनी वरील कारणांस्त दावा नामंजुर करण्याची विनंती केली आहे. ती चुकीची असल्याचे कथन केले आहे. करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी व प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जाच्या निर्णय निश्चिती करीता पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावर निष्कर्ष नोंदविले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत काय ? | ..नकारार्थी |
| **२.** | आदेश काय ? | ..अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

**<u>:: कारणमिमांसा ::</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबत –</u>**

**५.** प्रस्तुतचा अर्ज, अर्जास म्हणणे, दावा, दाव्याची कैफियत नि.क्र. १०६ वर झालेला आदेश रिट पीटीशन क्र. ६४४१/२०१४ मधील आदेश यांचे अवलोकन केले.

**६.** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या आदेशान्वये वादीने दाव्यामध्ये १/४ ऐवजी १/३ अशी दुरुस्ती मागितली होती. सदरची दुरुस्ती नामंजुर करण्यात आली. परंतु, प्रस्तुत आदेशान्वये जी दुरुस्ती मान्य करण्यात आली होती ती दुरुस्ती वादीने दाव्यामध्ये करताना नजरचुकीने व मागणीप्रमाणे दुरुस्ती मान्य झाली असे समजुन १/४ ऐवजी १/३ अशी दुरुस्ती करण्यात आल्याचे वादीकडून शपथेवर कथन करण्यात आले आहे. सदरची बाब प्रतिवादी क्र. १ कडून प्रस्तुतचा अर्ज दाखल झाला त्यावेळी निदर्शनास आले. वादीच्या म्हणण्याच्या अवलोकन केले

असता सदरची दुरुस्ती ही कोणताही हेतु ठेवुन किंवा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करण्याच्या दृष्टिने करण्यात आल्याचे दिसुन येत नाही. सदर चुकीची दुरुस्ती झाल्याची बाब निदर्शनास आल्याबरोबर वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करतानाच झालेली दुरुस्ती रद्द करुन मिळणेकरीता निशाणी क्र. १३५ वर अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती ही अनावधानाने झाल्याचे निष्पन्न होते. करीता मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत —**

७. मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्याने अर्ज नामंजूर होण्यास पात्र ठरला आहे. मुद्दा क्रमांक २ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** अर्ज (नि.क्र.१३२) नामंजुर करण्यात येत आहे.

**२.** खर्चाबाबत तुर्त आदेश नाही.

सही/—

दिनांक : ३०.०१.२०१९

( मिना प्र. एखे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
गेवराई